# Out Of Turn परीक्षा घेण्याबाबत महत्त्वाच्या सूचना

आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील जे विद्यार्थी मंडळाने निर्धारीत केलेल्या वेळापत्रकानुसार प्रात्यक्षिक, श्रेणी परीक्षा, तोंडी परीक्षा, प्रकल्प व तत्सम परीक्षा देऊ न शकल्यास अशा विद्यार्थ्यांची Out Of Turn परीक्षा घेण्याची तरतूद असल्याने सदर विद्यार्थ्यांचे परीक्षेस प्रविष्ट न होण्याचे कारण नमूद केलेला अर्ज, वैद्यकीय प्रमाणपत्र/तत्सम कारण, कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्यांचे अभिप्राय, प्रवेशपत्राची छायांकित प्रत, प्रती विषय रू. १००/- प्रमाणे निर्धारित परीक्षा शुल्कासह मंडळ कार्यालयात मंगळवार दि. १९.०३.२०२४ पर्यंत सादर करावी. दिनांक २०.०३.२०२४ नंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सदर शुल्क भरलेल्या विद्यार्थ्यांची Out Of Turn परीक्षा राज्यमंडळाच्या पत्र क्र.रा.मं./परीक्षा-६/४८५३, पुणे, दि. ०१.११.२०२३ नुसार बुधवार दि. २०.०३.२०२४ ते शुक्रवार दि. २२.०३.२०२४ या कालावधीत आयोजित करण्यात यावी.

निर्धारित कालावधीमध्ये जे विद्यार्थी गैरहजर राहिलेले आहेत, अशाच विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांक सदर OUT OF TURN परीक्षेसाठी ज्या त्या कनिष्ठ महाविद्यालयास उपलब्ध करून दिले जातील. सदर विद्यार्थ्यांचे गुण ऑनलाईन पद्धतीने " OUT OF TURN MARKS " या OPTION द्वारे नोंदवून कनिष्ठ महाविद्यालयांनी सदर परिपत्रकातील अ.क्र. १,२ व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**उपरोक्त कालावधीतील घेतलेल्या प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा, प्रकल्प व तत्सम परीक्षेचे म्हणजेच Out Of Turn परीक्षेचे Extra Entry चे तक्ते मंडळ कार्यालयात खालील तारखांना जमा करावेत.**

| जिल्ह्याचे नांव व क्रमांक | गुणतक्ते/ श्रेणीतक्ते व इतर साहित्य जमा करण्याचा दिनांक |
|---|---|
| जिल्हा - ३१/ ३२/ ३३ (मुंबई , बृहन्मुंबई पश्चिम उपनगर,मुंबई मध्य उपनगर)<br>जिल्हा -१६ / १७ / १८ (ठाणे, रायगड , पालघर) | शनिवार दिनांक -- २३ /०३/२०२४ |

टिप :-

**१. नियमित विद्यार्थ्यांचे गुण/ श्रेणी तक्त्याची Final Printout स्वतंत्र सिलबंद पाकिटात जमा करावी.**

**२. अतिविलंब विद्यार्थ्यांचे म्हणजेच अतिरिक्त बैठक क्रमांकाने प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांचे Extra Entry तक्ते वेगळ्या स्वतंत्र सिलबंद पाकिटात जमा करण्यात यावेत.**

**३. याप्रकारे OUT OF TURN ने प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांची पाकिटे उपरोक्त दिनांकास जमा करण्यात यावीत.**

(डॉ.सुभाष बोरसे)
विभागीय सचिव,
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी नवी मुंबई- ४०० ७०३.

प्रति,

प्राचार्य,
मुंबई विभागीय मंडळ क्षेत्रातील सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालये.

प्रत माहितीस्तव :-

१. मा. सचिव, राज्यमंडळ, पुणे.
२. मा. विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग.
३. शिक्षण निरिक्षक (दक्षिण/उत्तर/पश्चिम) विभाग.
४. शिक्षणाधिकारी (माध्य.) जि. प. ठाणे/पालघर/रायगड जिल्हे